rssportscomplex@gmail.com
8983320446, 7350678737

**R S SPORTS COMPLEX**

दिनांक:- ०७/१२/२०२४

विषय:- पहिली कै. भाऊसाहेब रानडे व शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले नवोदित मल्लखांब स्पर्धा २०२४- २५

महोदय / महोदया,

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की साने गुरुजी आरोग्य मंदिर आणि आर.एस. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, पुणे आयोजित पहिली कै. भाऊसाहेब रानडे व शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले नवोदित मल्लखांब स्पर्धा रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी आर.एस. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे स्पर्धेचे उद्घाटन दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता होईल व समारोप संध्याकाळी ७.०० वाजता होईल ही स्पर्धा जिल्ह्यातील नवोदित स्पर्धकांपुरतीच मर्यादित आहे **(राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना खेळाडूंना या स्पर्धेमध्ये सहभाग घेता येणार नाही).**

स्पर्धेसाठी वयोगट

**मुली**

१० वर्षाखालील, १२ वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १६ वर्षाखालील व १६ वर्षांवरील

**मुले**

१० वर्षाखालील, १२ वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १६ वर्षाखालील व १६ वर्षांवरील

प्रत्येक वयोगटातील प्रत्येक संघात ६ खेळाडू असतील संघात ६ पेक्षा अधिक खेळाडू असल्यास त्या संस्थेने ब संघ म्हणून प्रवेश घ्यावा प्रत्येक वयोगटात संस्था अ ब क ड......इत्यादी संघ स्पर्धेसाठी पाठवू शकतात सर्व वयोगटांसाठी स्पर्धा रविवार दिनांक 22 डिसेंबर 2024 रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ८.०० या वेळात घेण्यात येईल आपल्या संस्थेतील सहभागी होणाऱ्या खेळाडूंची गटवार नावे जन्म तारखेसह आमच्या पुढे दिलेल्या संकेत ठीक स्थळावर दिनांक 15 डिसेंबर 2024 पर्यंत पाठवावे https://www.mallakhambcompetition.com/ उशिरा प्रवेश नोंदवण्यासाठी आयोजकांकडून १००/- रुपये अतिरिक्त नोंदणी शुल्क आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अधिक माहितीसाठी **डॉ. तुषार गुजर-९८२२२९२०२०**

**श्री. यतीन नाचरे - ८४५१८८८८९९**

यांना संपर्क करावा

rssportscomplex@gmail.com
8983320446, 7350678737

R S SPORTS COMPLEX

## स्पर्धेसंबंधी काही महत्वाच्या सूचना

१. स्पर्धेचे प्रवेश शुल्क प्रती खेळाडू रुपये 250/- आकारण्यात येईल शुल्क भरल्याचे पावती संस्थेकडून त्वरित घ्यावी प्रवेश शुल्क भरल्यानंतर ते परत देण्यात येणार नाही किंवा त्यात फेरफार करता येणार नाही आयोजकांचा निर्णय अंतिम राहील.

२. संघटनेच्या अधिकृत निमंत्रित पंचांनी रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.००वाजता येऊन आपले उपस्थिती स्पर्धा संचालकांकडे नोंदवावी

३. प्रत्येक वयोगटातील पहिल्या ३ विजेत्या खेळाडूंना संस्थेतर्फे आकर्षक बक्षिसे व प्राविण्य प्रमाणपत्रे आणि सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रत्येक वयोगटातील पहिल्या दोन विजेत्या खेळाडूंची निवड सर्वोत्कृष्ट मल्लखांबपटू पुरुष व महिला स्पर्धसाठी करण्यात येईल.

४. स्पर्धा स्थळी पंच व खेळाडू यांच्या मौल्यवान वस्तू, पैसे इत्यादी गहाळ झाल्यास संस्था, संघटना व आयोजक जबाबदार राहणार नाही.

५. निषेध फी रुपये १०००/-राहील. आपला संच संपल्यानंतर ३० मिनिटांच्या आत स्पर्धा संचालक कडे नोंद करावी.

६. भाग्यपत्रिका दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी रात्री ९.०० वाजेपर्यंत दिलेल्या संकेतस्थळावरती प्राप्त होईल.

७. नोंदणी संबंधी तांत्रिक साहित्य सहाय्यतेसाठी श्री सुरज तुरटे (८८९८७८९२८८) यांच्याबरोबर संपर्क साधावा.

८. नवोदित स्पर्धेसाठी सांघिक सर्वसाधारण विजेतेपद देण्यात येईल, सांघिक सर्वसाधारण विजेतेपदासाठी प्रत्येक वयोगटातील पहिल्या ५ खेळाडूंच्या गुणांची बेरीज करण्यात येईल.

९. स्पर्धा प्रमुख म्हणून श्री रवी गायकवाड व स्पर्धा संचालक डॉ. तुषार गुजर हे काम पाहतील.

**टीप**

१. स्पर्धेसाठी येणाऱ्या पंचांचे मानधन व पंचांचे जेवण संस्थेतर्फे देण्यात येईल.

२. सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र व आकर्षक भेटवस्तू देण्यात येईल.

३. विजेत्या खेळाडूंना प्राविण्य प्रमाणपत्र व पदक देण्यात येईल.

४. सर्वोत्कृष्ट मल्लखांबपटू पुरुष व महिला यांना चषक देण्यात येईल.

आपले नम्र,

Godbole

श्री सुजय गोडबोले
स्पर्धा समन्वयक

डॉ. तुषार गुजर
स्पर्धा संचालक